कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/२०८२ /२०२५ दि. ११ /१२/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगर पालीकेच्या क्षेत्रात **"टाईम्स ऑफ इंडीया"** ग्रुपच्या वतीने रविवार दि.२१/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:३० वा. ते ०९:३० वा. पावेतो **"हॅपी स्ट्रीट"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येने नागरीक सहभागी होणार असल्याने सदर रोडवरील व परिसरातील वाहतुक सुनिश्चित व्हावी, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वाहतुक विभागाचे पोलीस उप आयुक्त म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुण पुढीलप्रमाणे अधिसुचना जाहीर करीत आहे.

प्रवेश बंद– १) वसंत विहार सर्कल कडुन काशिनाथ घाणेकर नाट्यगृह व खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहनांना **वसंत विहार सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– वसंत विहार सर्कल कडुन काशिनाथ घाणेकर नाट्गृह व खेवरा सर्कल कडे जाणारी वाहने वसंत विहार सर्कल जवळुन उजवीकडे वळण घेवुन विरुध्द दिशेने खेवरा सर्कल कडुन वसंत विहार सर्कलकडे येणाऱ्या वाहीनी वरुन इच्छित स्थळी जातील.

(नमुद दिनांक व वेळेत खेवरा सर्कल कडुन वसंत विहार सर्कलकडे येणारा रस्ता हा दोन्ही बाजुच्या वाहनांच्या रहदारी करीता खुला असणार आहे.)

सदरची वाहतुक अधिसुचना रविवार दि.२१/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:३० ते ०९:३० वा. पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायरब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्द अधिकारी, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/ वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे.
परिवहन व्यवस्थापनक,ठा.म.पा.ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
प्रत:— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. कासारवडवली वाहतूक उपविभाग ठाणे.